ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 10 | JUNE - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ``नाथ संप्रदाय- मध्ययुगीन सशक्त धार्मिक आंदोलन``



**मा. प्राचार्य-डॉ.एस. के. जोगी**
**(बी.ए., बी.एड, एम.ए., पीएच.डी.)**
**आई,८/१, मोहाडी फाटा, आदर्श नगर, जळगांव (महाराष्ट्र)**

**प्रस्तावना :**

मध्ययुगातील धार्मिक, अध्यात्मिक स्थितीचे वर्णन आत्म्याची अंध:कारमय रजनी (Darkness night of the soul) असे केले गेलेले आहे. याचे कारण त्यावेळी फैलवलेल्या साधनामार्गांनी आत्म्याच्या उन्नति ऐवजी अवनतिच होत होती. धार्मिक नेते व धनिक हे भोगवादात अनाचारात बुडालेले होते, तर सामान्य जनता दिशाहीन झालेली होती. निम्नस्तरावरील साधनांचा बोलबाला होता, त्यांनाच महत्व आल्यामुळे समाज पतनाच्या खाईत लोटला गेला. धर्म साधनेत अनिष्ट असे परिवर्तन व बदल घडत होते.

८४ सिध्दांच्या साधनेत मंत्र, तंत्र चमत्कार, वामाचार याला महत्व आले, बौध्दसिध्दांच्यामध्ये सिध्दीसाधना, युगनध्द, प्रज्ञोपाय, वज्रयान तंत्रयान, मंत्रयान, चमत्कृतिंना प्राधान्य मिळाल्यामुळै बुध्दाच्या मुळच्या उच्च कोटीच्या साधनेला उतरती कळा लागली. त्यांच्यात अनाचार माजला. पंचमकार साधनेमुळे मद्य, मांस मत्स्य, मुद्रा व मैथुनास महत्व आल्यामुळे भोगवाद बोकाळला. त्यामुळे बौध्दधर्माच्या ऱ्हासाला, सुरुवात झाली. या साधनांमध्ये ब्राम्हण व वेद प्रामाण्य नव्हते. शैव सुध्दा वेदाचाराला निम्नस्तराचा मानत. वज्रयानात तर मद्य, मंत्र, हठयोग व स्त्री प्रधान साधनेस महत्व होते. नाथंमधील कापालिक हे बाममार्गी सिध्द होते. जालंधर व कृष्णपाद हे अर्धे बौध्द व अर्धे शैव कापालिक असे साधक सिध्द होते. परिणामी सामान्य माणूस दिशाहिन व पतनाच्या गर्तेत लोटला गला. त्याला आत्मोन्नतिचा मार्ग दाखविणारा कोणीच नव्हता. स्त्रीयांकडे भोगदासी वृत्तीने पाहिले जाई, त्यामुळै त्यांचीही स्थिती हलाखिचीच होती.

अशा वेळेला गोरक्षनाथांचा अविर्भाव झाला इ.स. ८१० ते ९५० हा त्यांचा काळ. त्यांच्या प्रखर ब्रम्हचर्यामुळे, योग सामर्थ्याने तत्कालिन योग मार्गांचे, साधनांचे शुध्दीकरण करुन शुध्द योग मार्गावर आधारित नाथसंप्रदायाची मुहूर्त मेढ रोवली गेली. त्यावेळचे शैवांचे १२ व इतर शाक्त वगैरेंचे १८ संप्रदाय नष्ट करुन शिवाचे ६ व गोरक्षाचे ६ असा १२ पंथाचा नाथ संप्रदाय निर्माण केला. खालच्या स्तरावरील साधना काढून उच्च कोटिच्या योग साधनेला महत्व दिले. स्त्रीला मातेचा दर्जा देऊन तिची, उच्चपदी प्रतिष्ठापना केली. अंतरंगाच्या प्रगतीसाठी विविध साधना पध्दतिंचा शोध घेतला. कुंडलिनी साधनेस महत्व दिले. सामान्यांच्या उत्थानाचा मार्ग शोधून नाथमार्गाची स्थापना केली. प्रखर प्रकाशमय ज्योती युक्त निर्गुणोपासनेला प्रचारात आणले. साधनामार्गात नवनविन प्रयोग करुन विविध पध्दतिंचे प्रतिपादन केले. त्याला निरुपम व शास्त्रीय आधराची बैठक दिल्याने गोरक्ष हा आचार्यपदी पोहोचला. नाथसंप्रदायाचा नविन सुत्रपात त्यांनी केला. पुर्वीचे अनेक सांख्यवादी, बौध्द, जैन शक्त असे योगमार्गी त्यांना येऊन मिळाले. विविध आसने, ६ चक्रे, १० प्रमुख नाडया, अजपाजप (सोऽहं) निश्चित करुन प्राणायाम व कुंडलिनी साधनेस महत्व दिले.

याचाच परिपाक म्हणून त्यांच्या गुरुंच्या नावाने मत्सेंद्रासन व त्यांचे स्वत:चे गारेक्षासन ८४ आसनात प्रतिष्ठितपणे स्थानापन्न झाले. गोरक्षनाथच्या असामान्य कामगिरी मुळे आचार्य रजनिशंनी भारतिय अध्यात्मातील चार तळपत्या ताऱ्यांमध्ये गोरक्षाचाही समावेश केला आहे; ते असे कृष्ण, पतंजली, बुध्द व गोरक्ष.

गोरक्षांनी मनुष्यकेंद्रित नाथ साधना व नाथसंप्रदाय निर्माण केला. त्यामुळे सामान्य माणसेही सिध्द पदाला पोहोचली. हा संप्रदाय सर्व समावेशक व सर्व समरसतेवर आधारलेला आहे. यात जात, पात, लिंगभेद, धर्म, पंथ भेद याला विरोध आहे. या संप्रदायात मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, जालंधरनाथ, कानिफनाथ, गहिनीनाथ, भर्तृहरीनाथ, अडभंगनाथ, चर्पटीनाथ्, रेवतनाथ असे ९ नाथ व ८४ सिध्द झालेत. अनेक सिध्द तर हाडी, डोंब, अशा त्याज्य समाजातील आहेत. यात स्त्री, शुद्र, यांनाही मानाचे स्थान आहे. नाथ संप्रदायात चातुर्वण्य, वेद, यज्ञ, ब्राम्हण, पूजा, तीर्थयात्रा याला विरोध आहे. सर्व मतांना व जातींना आपल्यात सामावून अखंड भारतात एक प्रचंड नवा धर्म निर्माण करण्याचा प्रयत्न या नाथसंप्रदायाकडून झाला. एक जात हिंदूंचा अभेद्य समाज निर्माण व्हावा या आजच्या कल्पनेची मुहूर्तमेढ यापुर्वीच मत्स्येंद्र

गोरक्षदिकांकडून नवव्या-दहाव्या शतकाच्या सुमारास रोवली गेली. नाथपंथ सर्व संग्राहक वृत्तीचा होता. पतित परिवर्तनाचे फार मोठे काम या पंथाकडून झाले आहे.

६८ तीर्थे शरीरातच असल्याने कायायोग, कायासाधनेला महत्व आहे. यात पिंडी ते ब्रम्हांडी, शरीर विश्वाची, प्रतिकृती याला स्थान आहे. `हंसिबा खेलिबा, धरिबा ध्यानम्` याप्रमाणे सहज साधनेवर भर आहे. नाथ तत्व हे `निरंजन` (ज्योती रुप) स्वरुप आहे. ते `अलख` म्हणजे वर्णन करण्यापलिकडले, दृष्टिच्या पल्याड आहे. `आदेश` हा अभिवादनाचा शब्द आहे. त्यात आत्मा+देव+शरीर यांची सांगड आहे. शिव+शक्ति सामरस्य (समरसिकरण) हे शरीराव्दारे कुंडलिनी योगाचे साध्य आहे. हीच ह+ठ (चंद्र+सूर्यनाडी) साधना आहे ओंकार साधना ही साधनेचा भाग आहे. सोऽहं ही अजपाजप साधनापण या संप्रदायात आहे.

हा संप्रदाय सर्व भारतभर असून याचा प्रचार नेपाळ, तिबेट, चिन, पाकिस्तान, अफगणिस्तान, अरबस्तान पर्यंत झालेला आहे. `हिंदू ध्यावे देहुरा, मुसलमान मसित| जोगी ध्यावे परमपद | जहाँ मंदिर न मसित |` या निर्गुण निराकारवादी ईश्वरी साधनेमुळे मुस्लीमही जोगी झालेत. गोरखनाथंचे शिष्य खोरासान, बलुचिस्तान व अफगणिस्तान कडे पुष्कळ पसरले होते. बाबारतन हाजी (पेशावर) हा गोरक्षांचा शिष्य होता. नाथपंथात मुस्लिमांचाही समावेश होत असे. हिंदू मुस्लम ऐक्याची बिजे यात आहेत. पंजाब व उत्तर प्रदेशात मुस्लीम जोगी भरपूर आहेत. देश, धर्म व समाजाच्या रक्षणासाठी गोरक्षनाथाने राजस्थानमध्ये संन्याशांसाठी मल्लविद्देचे अखाडे स्थापन केलेत. तेच आज नाथसंन्याशांचे आखाडात विभागले गेलेत. गोरक्षाने संन्याशांन शस्त्रे देऊन, शस्त्रविद्याही शिकविली. जळगांवला तर ``मेहरुण तलाव`` गोरक्षाने इथल्या पाण्याच्या सोईसाठी खोदल्याची नोंद आहे.

गोरक्षाने संप्रदायाच्या प्रचार-प्रसारासाठी लोकभाषेचा,- हिंदीचा उपयोग केला. त्यांचे हिंदीत ४० व संस्कृतमध्ये २८ ग्रंथ आहेत. लोकभाषेचा प्रयोग करुन ते आद्य क्रांतीकारी हिंदीचे प्रथम कवि व लेखक झालेत. गोरक्ष हे हिंदी साहित्याची गंगोत्री आहेत; तसेच उत्तर भारतातील सर्व हिंदी संत परंपरेचा पायासुध्दा गोरक्षच आहेत; गोरक्ष नसता तर पुढील कबिर, नानक, दादू दयाल, वाजिद, फरिद, मीरा आदि संत परंपराच जन्मास आली नसती. या सर्वांच्या रचनेत गोरक्षाची साधना, तत्वे व भाषिक वैशिष्टये दिसून येतात.

महाराष्ट्रातही नाथसंप्रदायाच्या दोन परंपरा आहेत. १) विवेक सिंधूकर्ते मुकूंदराज यांची आदिनाथ, हरिनाथ, रघुनाथ्, मुकूंदराज. मुकूंदराजाचा विवेकसिंधू हा मराठी भाषेतला आद्य ग्रंथ आहे. मराठीची गंगोत्री ही नाथ संप्रदायच आहे.

दूसरी परंपरा ज्ञानेश्वरांची आहे. ती अशी आदिनाथ-मच्छेंद्रनाथ-गोरक्षनाथ- गहिनीनाथ- निवृत्तीनाथ-ज्ञानेश्वर. ज्ञानेश्वरांनीही गोरक्षनाथाप्रमाणेच अध्यात्मिक उपदेशासाठी लोकभाषेचा, मराठीचाच वापर केला. संस्क्रत गीतेचे भाष्य त्यांनी मराठीत आणले; हे पण ज्ञानेश्वरांचे क्रांतिकारत्वच आहे. तसेच उत्तर भारतातील संत परंपरेचा पाया जसे गोरक्ष आहेत; तसेच महाराष्ट्रातील मराठी संत परंपरेच पायाही ज्ञानेश्वरच आहेत. त्यांचेनंत नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखा, नरहरी, दामाजी, सावता, जनाबाई, कान्होपात्रा ही संत मंडळी अठरापगड जातीत उदयास आली. हे नाथ संप्रदायाचे मोठेपण आहे.

## निष्कर्ष :-

१) गोरक्षापासून नाथसंप्रदाय या नविन अध्यात्मिक परंपरेची सुरुवात.
२) नाथसंप्रदाय लोकभाषेचे उद्गाते (हिंदी व मराठी)
३) गोरक्ष हिंदीचे प्रथम साहित्यकार, तर मुकूंदराज मराठीचे आद्य साहित्यकार- दोन्ही भाषातील आद्य साहित्यकाराचा व साहित्याचा मान नाथसंप्रदायाकडेच जातो.
४) शंकराचार्य नंतर सर्वात महिमाशाली लोकनेता गोरक्ष होय.
५) नाथसंप्रदाय हा हिंदी व मराठी संत परंपरेची गंगोत्री आहे. (हिंदीत गोरक्ष- मराठीत ज्ञानेश्वर)
६) योगविद्येचे महामेरु- गोरक्ष व ज्ञानेश्वरच होते.
७) गोरक्ष व ज्ञानेश्वर दोघेही क्रांतिकारी संन्यासी होत.
८) नाथ संप्रदायाच्या उदयामुळे इतर अनिष्ठ धार्मिक साधना निष्प्रभ झाल्या.
९) समतेवर आधारीत समाजरचना-नाथसंप्रदायात आहे.
१०) हिंदू-मुस्लीम ऐक्याचा पाया यात घातला गेला.

## संदर्भ :-

१) मरौ हे जोगी मरौ - आचार्य रजनिश
२) राजस्थान का इतिहास - गोपीनाथ शर्मा
३) नाथसंप्रदाय - रा. चिं. ढेरे
४) नाथसंप्रदाय - हजारी प्रसाद त्रिवेदी

५) महाराष्ट्र सारवत (खंड-१) वि. स. भावे
६) हिंदी के प्रथम कवि - गोरक्षनाथ - कमलसिंह
७) गोरक्षनाथ - नाथसंप्रदायके परिप्रेक्ष्य में - डॉ. नागेंन्द्रनाथ उपाध्याय
८) गोरक्षबानी - सं. डॉ. पिताम्बर दत्त बडथ्वाल.
९) वैदिक देवता आणि संप्रदाय - ले.शं. बा. जोशी, सं. डॉ. कल्याण काळे.
१०) Gorakhnath and Mediaeval Hindu Mysticism - Dr. Mohan Singh.
११) गिरणाई - म.न.पा. जळगांव शताब्दी ग्रंथ - १९७०